जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट दिनांक २४.०७.२०२५

घरफोडी चोरी करणाऱ्या सराईत आरोपीतास अटक

दिनांक १४/०७/२०२५ रोजी फियादी नामे अतुल शरदचंद्र मराठे यांनी फिर्याद दिली की, त्यांचे घराचा कडीकोयंडा उचकटुन दिनांक १३/०७/२०२५ रोजी दुपारी ०१.३० वा. ते रात्रौ १०.३० वा. दरम्यान सोने व चांदीचे दागिने दागिने घरफोडी चोरी करून, एकुण ०७ लाख ९९ हजार किंमतीचे दागिने चोरी केले आहेत. फिर्यादी यांनी दिल्याने तक्रारी वरुन नौपाडा पोलीस स्टेशन गु.र.नं. ६००/२०२५ भा.न्या.सं.कलम ३०५,३३१(३), ३३१(४) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

आरोपीचा शोध घेण्यासाठी घटनास्थळावरील सीसीटिव्ही फुटेजची पाहणी केली असता एक महिला व तिच्या सोबत दोन मुले दिसुन येत होते. एका लहान मुलीच्या पाठीवरील बॅग मध्ये घरफोडीकरीता लागणारे सामान काढताना दिसुन आले. त्यानंतर ठाणे शहरातील तसेच इतर ठिकाणावरील सुमारे १०० हुन अधिक सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले असता सदर आरोपी महिला हि सराईत गुन्हेगार असल्याचे निषन्न झाले. ती घटनास्थळाकडे येताना ठाणे स्टेशन परिसर तसेच तलावपाळी परिसरात फिरत फिरत आली असल्याचे दिसुन आले होते. सदर घरफोडी करुन सदरची महिला ही पोलीसांना गुंगारा देण्याकरीता घटनास्थळावरील प्रत्येक रस्ता हा ३०० -४०० मीटर पुढेजावुन १५-२० मिनिट थांबुन पुन्हा रस्ता बदलत असे. तेथील परिसरातील इतर सीसीटिव्ही कॅमे-याची सतत पाहणी केली असता घटनेतील महिला व सोबत असलेल्या साथीदारांचा चेहरा स्पष्ट दिसुन आल्याने त्यांचा फोटो काढुन ठाणे शहरातील सिध्देश्वर तलाव, खोपट, तलावपाळी, चंदनवाडी ठाणे रेल्वे स्टेशन परिसर तसेच वागळे इस्टेट, वर्तकनगर, राबोडी, कळवा, मुंब्रा पोलीस ठाण्याचे हद्दीत तपास केला तसेच काही तांत्रिक तपासावरून व गोपनिय बातमीदाराकडुन मिळालेल्या बातमीनुसार सदरचे घरफोडी करणारी महिला व तिचे साथीदार दिवा परिसरात राहत असल्याची माहिती मिळाली त्याप्रमाणे दिवा गाव, साबेगाव, खर्डी गाव, दातीवली इ. ठिकाणी सलग दोन व दोन रात्र रेकी करून शोध घेतला असता आरोपी हा दिवा गावातील डंपीग ग्राउंडमध्ये दाट लोकवस्ती ठिकाणी राहतो सदर ठिकाणी गेले असता आरोपीने पोलीसांना पाहुन तेथुन पळुन जात असताना सपोनि भांगे व त्यांचे तपास पथकाने त्याचा पाठलाग करून आरोपी नामे गणेश दिलीप गुप्ता उर्फ गणेश प्रकाश आव्हाड,वय २० वर्षे,रा.डंपींग ग्राउंडच्या मागे,दिवा गाव,ठाणे यास घरफोडीच्या हत्यारासह शिताफीने ताब्यात घेवुन त्यास अटक केली आहे. आरोपीस मा.न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने त्याची दिनांक २५/०७/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर केलेली आहे. आरोपीकडे पोलीस कोठडी दरम्यान केलेल्या तपासामध्ये आरोपीने त्याची आई नामे पुजा दिलीप गुप्ता उर्फ पुजा प्रकाश आव्हाड,वय ४५ वर्षे,रा.डंपींग ग्राउंडच्या मागे,दिवा गाव,ठाणे हिचे सह मिळुन ठाणे शहर परिसरात अनेक घरफोडया व चो-या केल्याचे उघड झाले आहे. आरोपी हा त्यास मिळालेल्या घरफोडीतील मोठ्या प्रमाणात सोने व चांदी दागीने व शिक्के हे मुंबई व ठाणे परिसरातील सराफास विकून मिळालेले पैसे घेवुन परजिल्हयात पसार होण्याचा त्याचा मनसुबा होता.

अटक आरोपीकडुन १०,९९,०००/- रूपये किंमतीचे सोने व चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले असुन त्याचे कडुन नौपाडा पोलीस ठाणे हद्दीतील १० घरफोडी व चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहेत.

सदर कामगिरी पोलीस उप आयुक्त,परि.१ श्री.सुभाष बुरसे, सहा.पोलीस आयुक्त श्रीमती प्रिया डमाळे नौपाडा विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अभय महाजन, पोनि(गुन्हे) श्री.संजय दवणे, पोनि सुनिल तांबे(प्रशासन) यांचे मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी मंगेश भांगे, सहायक पोलीस निरीक्षक, पोहवा/गायकवाड, देसाई, गोलवड, तडवी, माळी, पोशि/ कांगणे, तिर्थकर,यांनी केलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर


ठाणे हद्द
फिंगरप्रिंट्स
नवघर पोलीस स्टेशन